# भारतीय इतिहासातील कर्तृत्ववान स्त्रिया

**डॉ.शिवाजी सोमला पवार**
एम.ए.,पीएच.डी.
संशोधन-मार्गदर्शक,इतिहास विभाग,
दिगंबरराव बिंदू महाविद्यालय,भोकर ता.भोकर जि.नांदेड

**प्रस्तावना :**

आज भारतीय स्त्री ज्या टप्यावर उभी आहे, तिथे पोहचण्यासाठी पूर्वीच्या स्त्रियांना किती परिश्रम करावे लागले, किती संघर्ष करावा लागला याची जाणीव आजच्या पिढीला कितपत माहिती आहे ? तसेच भारताच्या प्रबोधनाच्या वाटचालीत अग्रेसर असलेल्या स्त्रियांचे धैर्य, त्यांची सहनशक्ती, त्यांचा सूज्ञपणा, भवितव्यावरील अढळ निष्ठा व त्याग याची पुसटशी, आजची पिढी त्याची जाणीव ठेवणे व तो काळजीपूर्वक जतन करणे समर्थक ठरेल. भारतीय राष्ट्रवादाच्या उदय व विकासाबरोबरच भारतात प्रबोधनाची वाटचाल सुरु झाली व त्याचा परिपाक देशाला स्वातंत्र्य मिळण्यात झाला. त्यात पुरुषाच्या बरोबरीने असंख्य महिलांनी सक्रिय भूमिका बजावली. सामाजिक अन्याय, दृष्टी चालीरिती याविरुद्ध अथक लढा आणि भारतीय कला, साहित्य आणि सांस्कृतिक प्रगतीच्या इतर क्षेत्राचे पुनरुज्जीवन करण्याचे दमदार प्रयत्न, हे सर्व राष्ट्रवादी चळवळीच्या समांतरच चालू होते.[१]

इंग्लंड व इतर औद्योगिकदृष्टया प्रगत राष्ट्रांतील स्त्रियांप्रमाणे भारतीय महिलांना राजकीय अधिकार मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागला नाही हे खरे ! परंतु त्यांच्या मार्गक्रमणातील सामाजिक अडथळे मात्र भयावह होते. अशा दु:स्थितीत त्यांनी केलेले कार्य, त्यांनी दाखवलेले कर्तृत्व ही आपल्या देशाच्या राजकीय व सामाजिक इतिहासातील महान गाथा ठरते. समाजातील कर्तृत्ववान स्त्रियांना पावलोपावली घरातून, नातलगाकडून , समाजाकडून आणि परकीय शासनव्यवस्थेकडून सतत विरोध झाला. शतकानुशतके भारतात तसेच जगातील अन्य देशात स्त्रियांना गौण किंवा दुय्यम स्थान देण्यात आले आहे. आजही समाजावर, अर्थव्यवस्थेवर तसेच राजकारणावर पुरुषाचे वर्चस्व असलेले दिसते. गेल्या दोन दशकांहून अधिक काळात स्त्रियंच्या हक्कांबाबतची जाणीव निर्माण होऊन ती हळूहळू वाढीला लागली. शिका, संघटित व्हा आणि चळवळ करा हे ब्रीदवाक्य गेल्या काही वर्षात महिलांनी स्वीकारलेले दिसते. स्वतंत्र, मुक्त,जहाल,समाजवादी किंवा मार्किस्ट कोणत्याही विचारसरणीच्या असल्या तरी स्त्रियांचे सर्वत्र शोषण केले जाते व त्यांना दुय्यम स्थान दिले जाते. या बाबत स्त्रीवाद्यांचे एकमत आहे. पाश्चिमात्य देशात फेमिनिस्ट पॉलिटिकल थिअरी किंवा विमेन इन हिस्ट्री अशी अर्थपूर्ण शीर्षके असलेली पुस्तके प्रकाशित झाली आहेत. मात्र भारतीय स्वातंत्र्यलढयातील स्त्रियांच्या सहभागाविषयीचा सर्वसमावेशक इतिहास अद्याप कोणत्याही स्त्रीवाद्यांनी आपल्या देशात लिहिलेला नाही.[२.]

अमेरिकेमध्ये १९६० साली Women s Studies ची सुरुवात झाली, १९७५ नंतर या अध्ययनाला जोरदार चालना मिळाली एक स्वतंत्र ज्ञानशाखा म्हणून स्त्री अध्ययनाचा विकास होऊ लागला. १९७० च्या दशकात जगभरातील स्त्रिया स्त्री या नात्याने जवळ आल्या व त्यातूनच अनेक देशात स्त्री चळवळी जोर धरु लागल्या भारतामध्ये देखील भारतीय समाजाच्या परिप्रेक्ष्यात इतिहासातील स्त्रीचे कर्तृत्व नव्याने शोधण्याची परंपरा सुरु झाली आणि त्यातुनच इतिहासाकडे बघण्याचा एक स्त्रीवादी दृष्टीकोन विकसीत होऊ लागला . इतिहासातील आजपर्यंत अदृश्य असलेले स्त्रीचे प्रतिबिंब शोधत असतांना इतिहासाच्या अभ्यासकास प्राचीनकालीन, मध्यकालखंडातील सुलतानशाही, मोगलशाही, मराठेशाही, पेशवकालीन, भारतीय स्वातंत्र्यलढयातील स्त्रिया, समाजिक चळवळीतील स्त्रिया, भक्तीचळवळीतील स्त्रिया, शैक्षणिक चळवळीत स्त्रिया, राजकिय क्षेत्रातील स्त्रिया, वैज्ञानिक क्षेत्रातील स्त्रिया, क्रिडा क्षेत्रातील स्त्रिया, प्रशासकीय क्षेत्रातील स्त्रिया अशा विविध क्षेत्रात स्त्रिया कार्यरत असल्यातरी भारतीय स्त्री ही प्राचीन काळापासून ते समकालीन काळातही दुय्यम स्थानी असा एक ऐतिहासिक समज रुढ आहे. स्त्री जीवनाचा आढावा घेणे अपरीहार्य ठरते.[३]

**प्राचीन भारतीय स्त्रीया व स्त्री जीवन** :-

स्त्रीवादी इतिहास या शब्दाचा अर्थ स्त्रीचा इतिहास असा लावला जातो . पण स्त्रीवादी इतिहासाला एवढा संकूचित अर्थ या संदर्भात अपेक्षित नाही. स्त्रीवादी इतिहास म्हणजे इतिहासाच्या सर्व कालखंडात स्त्रियांची एकूण स्थिती, दर्जा, स्त्रियांचे प्रश्न, समस्या व त्याचे योगदान यांचा अभ्यास करणे हाय . जगात काय, भारतात काय, पुरुष वर्गातील इतिहासकारच मोठया संख्येने (९० टक्के)

होऊन गेल्याने स्त्रीवादी इतिहासलेखनाकडे दुर्लक्ष झाले आहे. परंतु १९७५ नंतर भारतातही स्त्रीवादी इतिहासलेखनास प्रारंभ झाला असून १९९० नंतर त्यास विशेष गती प्राप्ती झाली . वैदिक काळ स्त्रियांच्या दृष्टीने सुवर्णयुग होते, अशी मते मांडली, पण वैदिक काळातील सर्वसामान्य स्त्रियांच्या जीवनावर मात्र फारसे भाष्य केले गेले नाही.[४] बॅकोफेन, बिफ्रॉं यासारंख्या संशोधकांनी असंख्य पुरावे देऊन असा सिद्धांत प्रस्थापित केला आहे की, भटक्या पशुपालक अवस्थेतील लोकांची समाजरचना पुरुषप्रधान असते, तर प्राथमिक कृषिजीवी समाजाची रचना मातृसत्ताक, स्त्रीप्रधान असते. परंतु नागराचा शोध लागून शेती प्रगत अवस्थेत गेली आणि हळूहळू स्त्रीसत्ताक समाजसंघटना लुप्त होऊन पुरुषप्रधान समाजरचना प्रस्थापित झाली.

वैदिक कालखंडामध्ये इतर कालखंडाच्या तुलनेत स्त्रीजीवन पुष्कळ सुकर होते असे म्हणता येईल. स्त्रीला उपनयनाचा म्हणजेच पर्यायाने ज्ञानार्जनाचाही अधिकार होता. त्यामुळेच स्त्रियांमध्ये ब्रम्हवादिनी आणि संद्योवन हे प्रकार अस्तित्वात होते. उत्तर वैदिक कालखंडाच्या प्रारंभापर्यंत आर्यांचे भारतातील जीवन स्थिर झाले होते. या स्थिर शेतीप्रधान व्यवस्थेत स्त्रियांच्या आर्थिक आणि राजकीय सहभागाची आवश्यकता कमी होऊ लागली व तिच्या दर्जात घसरणीस प्रारंभ झाला. पुरुषसत्ता अबाधित ठेवण्यासाठी स्त्रियांवर अनेक बंधने याच काळापासून लादली गेली. प्राचीन काळात मुलगी वयात आल्यानंतर तिचा विवाह केला जात असे. समाजात ब्राम्हविवाह, प्राजापत्य विवाह, आर्षविवाह, दैवविवाह, असूरविवाह, गांधर्व विवाह, राक्षस विवाह, पैशाच विवाह व स्वयंवर प्रथा प्रचलित होती. समाजात एक पत्नीत्वाची पद्धती होती . परंतु राजे-महाराजे व श्रीमंत, प्रतिष्ठित लोक अनेक स्त्रियांशी विवाह करीत असत राजाच्या चार राण्यांची नावे तत्कालीन सामाजिक स्थितीची जाणीव करुन देतात. माहिषी (पट्टराणी), वावाता (सर्वाधिक प्रिय), परिवृक्ती (उपेक्षिता), पालागती (राजकीय अधिकाऱ्याची कन्या) ही राण्याची चार नावे आहेत. महाभारतात पांडूच्या मृतदेहाबरोबरच त्यांची पत्नी माद्री सत्ती गेली होती, वासुदेवाच्या चित्तेवर त्यांच्या चार पत्नी, देवकी, भद्रा. रोहिणी व मदिरा या सती गेल्या होत्या. कृष्णाच्या मृत्युची बातमी हस्तिनापुरला पाहोचताच त्यांच्या आठ पट्टराव्यापैकी रुख्मिणी, गांधारी, सह्या, हैमावती व जाम्बवती या पाच राण्या पतीच्या मृतदेहाशिवाय सत्ती गेल्या होत्या. पण सत्यभामा सती न जाना तपस्या करण्यासाठी वनात निघून गेली. सतीप्रथा क्षत्रियकर्ण व राजे लोकांच्यातच सुरु झाली . पडदा पद्धतीसुद्धा त्यांच्यातच सुरु झालेली होता. [५]. या काळात कर्तृत्वान स्त्रिया सावित्री, माधवी, शकुंतला, अंबा , द्रौपदी,[६] दमयंती, रेणुका, लोपामुद्रा, सुकन्या, देवयानी आणि शर्मिष्ठा, सत्यवती, अंबिका, अंबालिका, गांधारी, लाक्षागृहात जळालेली निषाद (आदिवासी) स्त्री, हिडिंबा[७], विश्वामित्राची अनामिक आई आणि बहिण सत्यवती, सुदर्शना, आणि ओघवती, अप्सरा पंचचूडा, रुचि[८], यशोधरा, संघमित्रा, राणी नागनिका, प्रभावती गुप्ता, तसेच मौर्य काळातील समाजात व कुटूंबात स्त्रियांना सन्मान होतो. गुप्तकालीन स्त्री ही पुरुषाची अर्धांगिणी समजली जात होती. समुद्रगुप्ताला अनेक सामंत राजांनी आपल्या मुली भेट दिल्या होत्या. या काळात स्वयंवर प्रथा प्रचलित होती. आपल्या पतीची उपेक्षा करणाऱ्या स्त्रियांसाठी याज्ञवल्क्याने व कौटिकल्याने नाक व कान कापण्याची शिक्षा फर्मावली. मनुने तिला म्हत्युदंडाची शिक्षा फर्मावली. स्त्रियाची हीच स्थिती हषवर्धन, राजपूत, चालूक्य, राष्ट्रकूट व यादवांच्या काळापर्यंत होती.[९]

**मध्ययुगातील भारतीय स्त्रिया व स्त्री जीवन :-**

मध्ययुगाचे तीन कालखंड पडतात त्यात हिंदू राजवटींचा कालखंड (६५०-१३१०), दिल्ली सल्तनतचा कालखंड(१२०६-१५२६)मोगल राजवटीचा कालखंड (१५२६-१७०७)असे कालखंडात गणजे जातात. भारतीय स्त्रीच्या जीवनातील अत्यंत अंधकारमय कालखंड म्हणजे मध्ययुगीन कालखंड होय. या कालखंडात सर्वच स्त्रियांना आर्थिक, साकाजिक, शैक्षणिक, धार्मिक , राजकीय असे सर्वच प्रकारचे हक्क नाकारण्यात आले होते. मध्ययुगीन कालखंड हा प्रामुख्याने मुस्लिम राज्यकर्त्यांच्या राजकीय वर्चस्वाचा कालखंड होता. त्यामुळे साहजीकच हिंदू धर्म व मुस्लिम धर्म यांच्यातील परस्पर संबंधातून एकमेकांच्य रुढी परंपरांचा प्रभाव परस्परांवर पडला. मुस्लिम आक्रमकांनी अनेक हिंदू स्त्रियांना आपल्या जनानखान्यात ओढले. पळवून नेऊन सक्तीने बाटवून त्यांच्याशी विवाह केले. मुस्लिम राज्यकर्त्यांचे जनानखाने असत.[१०] राजनीतीत सहभाग घेणारी सल्तनत काळातील पहिली स्त्री म्हणजे अल्तमशची पत्नी शाह तुर्कान ही होय, अल्तमशच्या मृत्यूनंतर सर्व दृष्टीनी अयोग्य अशा आपल्या पुत्रास गादीवर बसवून स्वतःच्या हाती सत्ता घेतली. अल्तमशची मुलगी सुलतान रझिया बेगम हिला राजनीतीचे शिक्षण मिळाले होते. रझिया चार वर्ष (१२३६-४०) सत्तेवर होती. जलालुद्दीन खिलजीची पत्नी मालिका- ए-जहान ही राजकीय महत्वाकांक्ष बाळगून होती व तिने काही काळ राजकीय सत्ता आपल्या हाती ठेवली होती. जैनपूरचा सुलतान महमूद शर्कीची पत्नी ही महत्वाकांक्षी होती. तसेच अल्लाउद्दीन

खिलजीने गुजरातचा राजा कर्ण याची बायको कमलादेवीशी विवाह केला. व रामचंद्र देवच्या मुलीशीही त्याने विवाह केले. गियासुद्दीन तुघ्लकच्या काळात दोन गायिका कतूह व मसूरत खातून प्रसिद्ध होत्या.[११]

मोगल कालखंडातील राणी कर्णावती (चितोड), राणी दुर्गावती (गोडवना),चांदबीबी (अहमदनगर), गुलबदन बेगम, जोधाबाई, नूरजहान, रोशनजहांआरा, जहाआरा झीनत-उ-निस्सा, जैबुंन्निसा या स्त्रियांच्या पराक्रमाच्या कथा आजपर्यंत लोकांच्या मनात घर करुन बसल्या आहेत. जहांगीरची पत्नी नूरजहान हिचा जहांगीरवर तर प्रभाव होताच; पण राजनीतीवरही तिचे वर्चस्व होते. हुमायूनची पत्नी खानजारा बेगमने हुमायुनास राजकीय प्रश्नांत मदत केली होती [१२]. शिवशाही व पेशवाईतील स्त्री जीवनाचा कालखंड इ.स.१६३०-१७०७ पर्यंत गणला जातो. मराठेशाहीतील मनस्विनी हा डॉ.सुरेश देशपांडे यांचा ग्रंथ अनेक दृष्टीनी महत्वाचा आहे. शिवशाही आणि पेशवाई यांच्या दोन शतकांतील राजकीय,ऐतिहासिक परिस्थिती ही या पुस्तकातील स्त्रियांच्या कर्तृत्वाची पार्श्वभूमी आहे. राजघराण्यातील किवा श्रीमंताच्या स्त्रिया काही मूल्ये उराशी धरुन, न्यायासाठी, कर्तव्यासाठी, क्वचित घराण्याच्या पुण्याईसाठी हातात समशेरी आणि मनात धारदार निष्ठा घेऊन शिवमातात जिजाऊ, महाराणी येसुबाई, महाराणी ताराबाई, महाराणी जिजाबाई (करवीर),मस्तानी, गोपिकाबाई,आनंदीबाई, अहिल्याबाई होळकर, राणी लक्ष्मीबाई,[१३] या राजघराण्यातील स्त्रियांचा राजकारणात महत्वाचा सहभाग होता. एवढेच नव्हे तर त्या स्त्रिया राजकीय करार, तहनामेप्रसंगी सल्लामसलत करणे यात अतिशय मुत्सद्दी व बुद्धिमान होत्या. राजकारणातले त्यांचे वर्णन वाखाणण्याजोगे होते. धर्मशास्त्रांनी घालून दिलेले नीतिनियम, प्रथा, परंपरा, व्रतवैकल्ये, चालिरिती इ.गोष्टीशी स्त्रियांचे सामाजिक जीवन बांधलेले दिसून येते. परंतू मराठा सरदारच्या स्त्रिया दिसण्यात व वागणूकीत धैयवान व कणखर प्रवृत्तीच्या होत्या[१४].

**आधुनिक भारतातील स्त्रिया व स्त्री जीवन :-**

१९ व्या शतकाच्या सुरुवातीस भारताच्या आधुनिकीकरणास चालना देणारी सर्वांगीण सुधारणेची चळवळ सुरु झाली त्यास भारतीय प्रबोधन असे म्हटले जाते.ब्रिटिश सत्तेचा भारतावर प्राप्त विजय, पाश्चात्य ज्ञान, विचारांचा भारतात सुरु झालेला प्रसार, ख्रिश्चन मिशनरी व राज्यकर्त्यांनी भारतीय समाज संस्कृतीवर केलेली टीका, भारताबाबतचे गौरवपूर्ण इतिहासलेखन या साऱ्यातून तत्कालीन सामाजिक, राजकीय स्थितीची चिकित्सा करुन त्या सुधारणांसाठी केलेल्या व्यक्तिगत व संस्थात्मक प्रयत्नांचा समावेश भारतीय प्रबोधन चळवळीत होतो.[१५]१९ व्या शतकापर्यंत सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय दृष्टया स्त्रियांचा दर्जा प्रचंड खालावला होता. स्त्रिचे कुटुंबातील स्थान , जातीव्यवस्था बंदिस्त स्त्री, बालविवाह, विधवा पुर्नविवाह, बालहत्या, सतीप्रथा, केशवपन, स्त्री शिक्षणाची पहाट, मनोरंजन, वृत्त, वैकल्य, नवस, अलंकार, पोषाख, केशवभूषा, आहार, कृषीव्यवस्थेतील स्त्रियांचा सहभाग उद्योगधंद्यामधील स्त्रिसयांचा सहभाग, वैद्यकीय क्षेत्रात आनंदीबाई जोशी, रखमाबाई , कादंबीनी बासू, हिल्डा लाझारस, मुथुलक्षमी रेड्डी यांनी या व्यवसायात प्रवेश केला. स्वातंत्र्य लढयातील तळागाळातील कार्यकर्त्या स्त्रिया आणि सत्याग्रहात सहभागी झाल्या त्यात अँनी बेझेंट, पंडिता रमाबाई, मादामा भिकाजी कामा, डॉ.सरोजिनी नायडू, येसूबाई सावरकर, कल्पनादत्त, अनीला गद्रे, अनुया राजीव चापेकर, अरुणा असफ अली, मनीषा डिखोळकर, कॅप्टन लक्ष्मीबाई सेहगल, मणीबेन नानावटी, मृदुला साराभाई, पदमश्री मणीबेन कारा, श्रीमती कमलाबेन पटेल, अवंतिकाबाई गोखले, पेरिन कॅप्टन, मीरबेन (मॅडेलीन स्लेड)[१६],रमाबाई रानडे, जनाक्का शिंदे, पार्वतीबाई आठवले, आनंदीबाई कर्वे, कस्तूरबागांधी, कमला नेहरु, कमलादेवी चटोपाध्याय, विजयालक्ष्मी पंडित, या महान कर्तृत्वान महिला १९ व्या शतकातील महाराष्ट्रातीलच नव्हे तर एकूण भारत देशातील सामाजिक, आर्थिक धार्मिक आणि आणि सांस्कृतिक स्थिती कमी अधिक प्रमाणात एक समान होती.

**निष्कर्ष :-**

भारताची संस्कृती महान मानली जाते कारण या संस्कृतीतील संस्कार महान आहेत. भारतीय स्त्री ही संस्काराची मूर्ती समजली जाते. तसेच स्त्री ही मातृत्वाचे आणि वात्सल्याचे प्रतीक आहे. फ्रेंच समाजवादी विचारवंत चार्लक्ष फेरियर म्हटल्याप्रमाणे एखाद्या राष्ट्राकडून स्त्रीला दिल्या जाणाऱ्या सामाजिक व राजकीय महत्वावरुन त्या राष्ट्राची सांस्कृतिक उंची मोजता येते, जोपर्यंत महिला पुढे येत नाहीत ; तोपर्यंत समाजाचे, राष्ट्राचे कल्याण होणार नाही, हे महात्मा गांधीचे उद्गार योग्य वाटतात. डॉ.वसंतराव गोवारीकर म्हणतात, स्त्रियांच्या हाती सत्त दिली, सगळा कारभार सोपविला ; तर देश महासत्ता होण्यास वेळ लागणार नाही म. ज्योतीबा फुले म्हणतात, स्त्री ही पुरुषापेक्षा श्रेष्ठ आहे, गुरुपु माता गरीयसी हा विचार त्यांनी शिरोधार्य मांडला.

नव्या युगाची ही स्त्री आता तिमिरातून तेजाकडे वाटचाल करत आहे. त्याच्या दास्याचे पाश आता सुटू लागले आहेत . त्याची गती संथ असते पण एक निश्चित गती या मुक्ततेला जरुर आहे. आता प्रत्यक्ष काळच स्त्रीचा पाठीराखा झाला आहे. स्वातंत्र्य व समतेचे हळद-कुंकू काळच स्त्रियांच्या ललाटावर रेखाटेल.[१७] नव्या युगाची महिला मी । आहे समर्थ क्रांती घडविला मी ।। जगेन माणूस म्हणूनी मी । नीती आणि मूल्य सांभाळूनी मी ।।

आजच्या आधुनिक भारताच्या जडणघडणीत ज्या अगणित महिलांनी मौलिक योगदान केले, त्यांच्या असीम संघर्षांशी, आशा आकांक्षाची व कामगिरीची शक्य कितकी प्रत्यक्ष व विश्वसनीय कथा अलीकडच्या तरुण पिढीपुढे मांडावी. त्यांच्या कार्यांचे मोल तरुण पिढीच्या मनावर बिंबवावे, ह्या धोरणेतून प्रस्तूत ग्रंथाचा जन्म झाला. भारताच्या निरनिराळया भागांतील असामान्य गुणवत्तेच्या महिलांनी स्त्रियांच्या उत्थानासाठी, सामाजिक दोषांच्या निर्मुलनासाठी, महिलांना शिक्षित करण्यससाठी, तसेच समाजात त्यांना सुयोग्य दर्जा मिळवून देण्यसासाठी तनमनधनाने स्वतःला वाहून घेतले.१८ भारताच्या इतिहासात अनेक कर्तबगार स्त्रिया होऊन गेल्या. त्यांनी राजकारण, समाजकारण, शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान, कला, साहित्य, क्रिडा, चित्रपट, वैद्यकियक्षेत्र, वकिल, वैमानिक, संरक्षणक्षेत्र,संशोधन व संस्कृती अशा विविध क्षेत्रा स्वकर्तुत्वाने इतिहास निर्माण करणाऱ्या क्रांतीकारक महिला उदयास आल्या. प्राचीन भारतीय समाजात स्त्रियांना सुरुवातीच्या काळात समाज आणि कुटुंबात मानाचे स्थान होते. परंतु नंतरच्या काळात या स्थितीत बदल झाला. त्यांच्यावर अनेक निबंध लावण्यात आले. पुढे समाजसुधारक आणि ब्रिटिश सरकारच्या काही प्रयत्नामुळे स्त्रियांच्या बाबतीत सुधारणा हाण्यास मदत झाली. त्यांना शिक्षणाची द्वारे खुली
झाली. भारतात राष्ट्रीय चळवळ, क्रांतिकारी चळवळ, हैदराबाद स्वातंत्र्य संग्राम, गोवा मुक्ती संग्राम व आंबेडकरी चळवळीत स्त्रियांचा सक्रिय सहभाग राहिला.[१९]

प्राचीन काळापासून ते थेट आजपर्यंतच्या भारतीय स्त्रियांच्या प्रश्नांचा कर्तृत्वाचा, दुःखांचा , हुंडाबळी, बलात्कार, स्त्री भ्रणहत्या,बालविवाह, घटस्फोट, सक्तीचे वैधव्य, परित्यक्तेचे जीवन, स्त्रीचे शिक्षण, आरोग्य स्वातंत्र्यावरील निबंध हे आज भारतीय स्त्रियांच्या पुढील प्रश्न आहेत. प्राचीन व मध्ययुगीन कालखंडातील स्त्रियांचा दर्जा, संत स्त्रिया[२०], १९ व्या शतकातील स्त्री सुधारकांचे कार्य, महिलांच्या परिषदा व संघटना, स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रियांचे योगदान, ब्रिटिश सरकारने व भारत सरकारने पास केलेले स्त्री उद्धाराचे कायदे, समाजसुधारकांचे स्त्रीमुक्ती बद्दलचे चिंतन, स्त्रियांचे शिक्षण, सामाजिक चळवळी व स्त्रिया, स्वातंत्र्योत्तर काळखंडातील विविध क्षेत्रात कार्यकरणाऱ्या महिलांचे योगदान. अशा विविध अंगाने प्रस्तुत संशोधनात मांडणी केली आहे. स्त्रीमुक्तीचा अर्थही स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. भारतीय इतिहासातील शेकडो स्त्रियांच्या जीवनकार्यांची तसेच स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्री कार्यकर्तीच्या कार्याची ओळख वाचकांना होणार आहे[२१] .

**संदर्भसूची :**


१. शांता कोठेकर (अनुवाद), भारतीय प्रबोधनाच्या महिला प्रणेत्या, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, नवी दिल्ली, २०१३, पृष्ठ १५,१७.

२. वासंती फडके (अनुवाद), भारतीय स्वातंत्र्य लढयातील स्त्रिया, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, जानेवारी २००३ पृष्ठ २.

३. प्रा.सुनिता बोर्डे, प्रा. संतोष खडसे, ऐतिहासिक परिप्रेक्ष्यातील स्त्रिया, शुभम पब्लिकेशन्स, पुणे,१ जानेवारी २०१०, पृष्ठ १७.

४. डॉ.एम.एस.गाठाळ, भारतीय इतिहासातील स्त्रिया व स्त्री जीवन, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, जुलै २०१३, पृष्ठ ७.

५. डॉ.विजया साखरे, भारतीय स्त्री चळवळीचा इतिहास,अक्षरलेण प्रकाशन, सोलापूर, २६ जून २०१३, पृष्ठ १०.

६. डॉ.आ.ह.साळुंखे, महाभारतातील स्त्रिया (भाग-२), सुगावा प्रकाशन, पुणे, आवृत्ती चौथी, एप्रिल २००६, पृ.४

७. डॉ.आ.ह.साळुंखे, महाभारतातील स्त्रिया, भाग-२, लोकायत प्रकाशन, सातारा, डिसेंबर २०११, पृष्ठ ६.

८. डॉ.आ.ह.साळुंखे, महाभारतातील स्त्रिया-भाग-३, लोकायत प्रकाशन, सातारा, पुर्नमुद्रण-जुलै २०१२.

९. पुर्वोक्त, डॉ.विजया साखरे,पृष्ठ २८.

१०. पुर्वोक्त,प्रा.सुनिता बोर्डे, प्रा.संतोष खडसे, पृष्ठ २२

११. पुर्वोक्त, डॉ.एस.एस.गाठाळ, पृष्ठ २८